संपादकीय

# 'संगीतकलानिधींचे सव्वाशे वयमान!'

## आज २० जानेवारी रोजी कै. कृष्णाजी गणेश फुलंब्रीकर उर्फ संगीतकलानिधी मास्टर कृष्णराव / मास्तर कृष्णराव यांची १२५ वी म्हणजेच शतकोत्तर रौप्य जयंती आहे. यानिमित्त मास्टर कृष्णरावांचे हे संस्मरण!

कृष्णाजी गणेश फुलंब्रीकर म्हणजेच संगीतकलानिधी मास्टर कृष्णराव फुलंब्रीकर. त्यांना नुसते 'मास्तर' या नावाने अधिक संबोधले जायचे.

मास्तर कृष्णराव यांचा जन्म २० जानेवारी १८९८ रोजी अलंकापुरी येथे आजोळी नेर्लेकर वाड्यात झाला. हे मूळ घराणे मराठवाड्यातील फुलंब्री गावातील पाठक आडनावाच्या वेद पठण करणाऱ्या वेद ज्ञानी ब्राह्मणांचे! श्रीमंत नानासाहेब पेशवे यांनी या घराण्यातील वेदज्ञानी ब्राह्मणास त्यांच्यासमोर सुस्वर व स्पष्ट ऋचा गायल्या म्हणून त्यांचा सन्मान करून त्यांना फुलंब्रीकर अशी उपाधी दिली. त्यांचे मूळ गाव मराठवाड्यातील फुलंब्री असले, तरी त्यांच्या गेल्या अनेक पिढ्या पुणे येथे स्थायिक झालेल्या असून, कृष्णरावांचे वास्तव्य प्रामुख्याने पुणे येथेच घडले.

कृष्णा मास्तर लहान असतानाच एकाएकी त्यांचे पितृछत्र हरपले आणि या मूळच्या सधन कुटुंबाला हलाखीच्या परिस्थितीला तोंड द्यावे लागले. मास्तरांना संगीताची उपजतच आवड होती. वयाच्या दहाव्या वर्षी नाट्यकला प्रवर्तक संगीत नाटक मंडळी या आघाडीच्या मराठी संगीत नाट्यसंस्थेत बाल गायक नट म्हणून भूमिका करण्याची संधी लाभली. नाटकातील पदांकरता मास्तरांना उस्ताद निसार हुसेन खान आणि सवाई गंधर्व यांचे मोलाचे संगीत मार्गदर्शन लाभले. नाट्यकला प्रवर्तकच्या 'संगीत संत सखुबाई' या नाटकात सवाई गंधर्व संत सखुबाईची भूमिका करत असत, तर त्यात बाल गायक नट कृष्णा (मास्तर) हा 'विठ्ठल' भगवंताची भूमिका साकारत असे. विठ्ठलाच्या भूमिकेत मास्तर 'भक्तजन सदा म्हणती दयसिंधु मला' हे नाट्यपद अतिशय बोलका अभिनय करून सुरेल म्हणत असत. याच संस्थेच्या 'राजा हरिश्चंद्र' ह्या नाटकामध्ये लहानगा कृष्णा संत रोहिदासाची भूमिका करत असे, तर 'संगीत सौभद्र' मध्ये नारदमुनी ही त्याची आवडती भूमिका साकारत असे. त्याकाळी संत सखुबाई हे संगीत नाटक अत्यंत गाजले. संत सखुबाईचा नाट्यप्रयोग बघायला दोन थोर कलावंत गायनाचार्य पं. भास्करबुवा बखले आणि पं. बाळकृष्णबुवा इचलकरंजीकर हे आले होते. त्यावेळेस बाल नट कृष्णाच्या गाण्यातील गोडवा आणि चतुराई बखलेबुवांनी हेरली व हा मुलगा नीट गाणे शिकल्यास पुढे मोठा गवई होईल, असे भाकीत वर्तवले. त्याच सुमारास म्हणजे १९११ साली मास्तरांचे गंडाबंधन होऊन, शास्त्रीय गाण्याचे शिक्षण पंडित बखलेबुवांकडे सुरू झाले. त्याच वर्षी गुरुवर्य बखलेबुवांनी मास्तरांची धुळे येथे कमिन्स क्लबमध्ये पहिली स्वतंत्र अशी जाहीर मैफल केली. ती मैफल त्यांनी चांगलीच गाजवली. त्यांना साहित्यसम्राट न. चिं. उर्फ तात्यासाहेब केळकर यांच्या हस्ते सुवर्णपदक देऊन 'मास्टर कृष्णा' अशी उपाधी बहाल करून गौरवले.

भास्करबुवा बखले यांनी मास्तरांना पुत्रवत शिष्य मानून आग्रा, जयपूर व ग्वाल्हेर अशा तिन्ही घराण्यांचा त्रिवेणी संगम असलेली आपली ढंगदार व भारदस्त गायकी शिकवली. बखलेबुवांकडे सलग चार वर्षे प्रत्यक्ष तालीम घेत असताना अल्पावधीतच मास्तर शास्त्रीय संगीतात तरबेज झाले. एकूण सुमारे दहा वर्षे मास्तरांनी बुवांना भारतभर ठिकठिकाणी तंबोऱ्यावर साथसंगत केली.

चार वर्षे सलग तालीम घेतल्यावर मास्तर शास्त्रीय गायनाच्या स्वतंत्र मैफिली करू लागले, बुवांच्या मार्गदर्शनाखाली व स्वतंत्र देखील संगीत दिग्दर्शन करू लागले. ते शास्त्रीय बंदिशी बांधू लागले, नवीन अनवट व जोड राग निर्मिती करू लागले, स्वतंत्र स्वररचनेतील नवीन चाली देऊ लागले व काही जुन्या चाली बदलून त्या गाण्यास नवीन रुपात सादर करू लागले.

पूर्वी भक्तिसंगीत हे वारकरी पद्धतीने गायले जायचे. मास्तरांनी मात्र भक्तिसंगीताला शास्त्रीय संगीताच्या चौकटीत बसवून भक्तिसंगीत विश्वात एक नवे देखणे दालन निर्माण केले. याचे उदाहरणच द्यायचे झाले तर मराठी नाट्यसृष्टीत गंधर्व नाटक मंडळीच्या 'संगीत संत कान्होपात्रा' चे देता येईल आणि मराठी चित्रपट सृष्टीत प्रभात फिल्म कंपनीच्या 'धर्मात्मा' चे देता येईल. मास्तरांनी संगीत दिलेले कान्होपात्रा हे नाटक स्वतंत्र भक्तिसंगीत रचनेचा मराठी संगीत नाट्यसृष्टीत केलेला पहिला प्रयोग म्हणून मैलाचा दगड ठरते. या भक्तिरसाने परिपूर्ण असलेल्या नाटकातील सर्व नाट्यपदे विशेषतः 'जोहार मायबाप जोहार', 'अवघाची संसार सुखाचा करीन', 'अगा वैकुंठीच्या राया' ही पदे अजूनही तितकीच



रसिकप्रिय आहेत. तसेच संत एकनाथ महाराजांच्या जीवनावर आधारित असलेल्या धर्मात्मा चित्रपटात मास्तरांनी अभंग व पदांना सर्वस्वी नवीन चाली देऊन चित्रपटातील भक्तिसंगीतात नावीन्य आणले. भक्तिगीतांना शास्त्रीय रागदारीवर आधारित सर्वस्वी नवीन चाली देण्याचा प्रयोग प्रथम मास्तरांनी केला.

मास्तरांचे एकूण सांगीतिक कार्य लक्षात घेता शास्त्रीय संगीत, नाट्यसंगीत, भावसंगीत, सुगम संगीत, भक्तिसंगीत, चित्रपट संगीत आणि देश संगीत ही कार्यक्षेत्रे सहज दिसून येतात. या सर्व क्षेत्रांमध्ये मास्तरांनी शास्त्रीय गायक, शास्त्रीय रचनाकार, वाग्गेयकार, संगीत नाटकातील स्त्री व पुरुष गायक नट, चित्रपटातील पार्श्वगायक, गायक नट, भक्ति गीते व देश गीतांचा गायक, रचनाकार आणि संगीत दिग्दर्शक या नात्याने आपला वेगळा ठसा उमटवला आहे. त्यांनी प्रभात फिल्म कंपनीच्या धर्मात्मा, गोपालकृष्ण, अमरज्योती, माणूस, शेजारी, वहाँ, लाखारानी अशा सर्व चित्रपटांना वैशिष्ट्यपूर्ण संगीत दिले. माणूस चित्रपटातील 'कशाला उद्याची बात' हे भारतीय सिनेसृष्टीतील पहिले बहुभाषिक गीत असून, या गीताने लोकप्रियतेचा उच्चांक गाठला. शेजारी चित्रपटातील 'लख लख चंदेरी' हे मशालनृत्यगीत सर्वार्थाने वैशिष्ट्यपूर्ण ठरले.

**प्रिया फुलंब्रीकर**

### बालगंधर्व व मास्तर कृष्णराव

गंधर्व नाटक मंडळीत गायक नट, संगीतकार व संगीत शिक्षक अशा भूमिका निभावणारे मास्तर हे एक आघाडीचे कलाकार होते. गुरुवर्य बखलेबुवांचे ८ एप्रिल १९२२ रोजी निधन झाल्यानंतर त्यांचे पट्टशिष्य असलेल्या मास्तरांनी गंधर्व नाटक कंपनीत संगीतकार म्हणून कंपनीच्या अखेरपर्यंत बुवांची गादी चालवली. वयाने मास्तरांपेक्षा मोठे असलेले बालगंधर्व गुरुवर्य बुवांच्या निर्वाणानंतर मास्तरांना आपल्या गुरुस्थानी मानत. म्हणून बालगंधर्व मैफलीत मास्तराच्या नंतर कधीही गायला बसायचे नाहीत. मास्तरांच्या षष्ठ्यब्दीपूर्ती समारंभात बालगंधर्व त्यांच्या गौरवपर ध्वनिमुद्रित भाषणात म्हणाले आहेत, मास्तर माझे गुरुबंधु आहेत आणि माझे गुरू पण आहेत. त्यांनी आम्हाला शिकविले आहे. माझ्या सात नाटकांना त्यांनी चाली दिल्या आहेत.

गंधर्व नाटक मंडळी बंद पडल्यानंतर परत मास्तर नाट्यसंगीताकडे सन १९४२ मध्ये वळले. नाट्यनिकेतन संस्थेच्या 'कुलवधू' नाटकास मास्तरांनी शास्त्रीय संगीताला भावगीतांचे वळण देऊन नाट्यपदांसाठी कालानुरूप चाली दिल्या. या नाटकातील 'बोला अमृत बोला' हे भैरवीतील नाट्यपद या आधुनिक काळात देखील लोकप्रिय असून मास्तरांच्या शिरपेचातील 'मास्टर पीस'चा बहुमान मिरवत आहे.

व्ही.शांताराम यांनी प्रभात सोडून राजकमल कलामंदिर संस्थेची स्थापना केली. १९४४ मध्ये निर्माण केलेला 'भक्तिचा मळा' हा राजकमलचा 'पहिला मराठी चित्रपट'. या चित्रपटात मास्तर कृष्णरावांनी कर्मयोगी संत शिरोमणी सावता माळी यांची प्रमुख भूमिका उत्तमरित्या साकारली. आपला अभिनय वास्तववादी व्हावा म्हणून मास्तरांनी कोणतीही डमी न वापरता स्वतः बैलगाडी चालवायला, नांगरणी करायला, विहीर खोदायला शिकून त्याचा सराव केला व चित्रपटात दृष्ये दिली. तसेच त्यांनी या चित्रपटास संगीत दिले व स्वतःच्या गाण्यांचे स्वतः गायनदेखील केले. या चित्रपटातील 'कांदा मुळा भाजी। अवघी विठाई माझी।।', 'विश्वाचे अमुचे हे वैभव सारे, आम्ही दुनियेचे राजे' व 'राजा पंढरीचा हरी माझा आला' ही भक्तीरसाने ओथंबलेली गीते श्रोत्यांच्या आग्रहास्तव अनेकदा मास्तर त्यांच्या शास्त्रीय गायन मैफिलीतदेखील म्हणत असत.

भास्करबुवांनी स्थापन केलेल्या पुणे भारत गायन समाज या संस्थेकरिता मास्तरांनी 'रागमाला संग्रह – भाग १ ते ७' हा भारत सरकारची मान्यता मिळालेला संपूर्ण शास्त्रीय संगीत गायन अभ्यासक्रम तयार केला. तसेच राष्ट्रसंगीत, संगीत मोहनमाळ अशी स्वरावलीची पुस्तके लिहिली व संगीत स्वयंवर, संगीत कान्होपात्रा नाटक, भक्तीचा मळा चित्रपट, इत्यादींच्या स्वरावलीची पुस्तके लिहून प्रकाशित केली.

मास्तर स्वभावाने आनंदी, बोलके व मिष्किल होते. मास्तरांच्या प्रत्येक मैफिलीत एक प्रकारचे प्रसन्न, आनंदवर्धक व उत्साहवर्धक वातावरण असायचे. 'राखावी बहुतांची अंतरे' अशा स्वभावाची जगन्मित्र मास्तरांना उपजत देणगी होती. मास्तर मैफलीत गायन सादर करते वेळी स्टेजवरील आपल्या साथीदारांशी तसेच उपस्थित रसिकश्रोत्यांशी खेळीमेळीने सहज संवाद साधायचे; त्यामुळे मास्तर आपल्याकरिताच गात आहेत अशा सुखद भावनेने प्रत्येक श्रोता मास्तरांच्या मैफिलीचा रसास्वाद घेत असे. एकदा एका संगीततज्ज्ञाने त्यांना अत्यंत गंभीरपणे विचारले, मास्तर, तुम्ही फार चांगल्या चाली देता बुवा! इतक्या चांगल्या चाली तुम्हाला सुचतात कशा? त्यावर मास्तरांनी मिश्कीलपणे पण गंभीर चेहरा करून उत्तर दिले, माझ्या चाली चांगल्या असतात कारण, मी मूळचाच चांगल्या चालीचा आहे.

मास्तर जसे देवभक्त होते तसे ते कट्टर देशभक्त ही होते. स्वातंत्र्यपूर्व काळापासून त्यांनी 'वंदे मातरम्' हे गीत राष्ट्रगीत व्हावे म्हणून संगीताच्या माध्यमातून देशव्यापी कार्य सुरू केले. पुण्यात १९३७ मध्ये टिळक स्मारक मंदिरात देशातील पहिला वंदे मातरम् दिन साजरा करण्यात आला; त्यावेळी मास्तरांनी स्वकृत चालीत संपूर्ण वंदे मातरम् गाऊन सादर केले होते. चले जाव चळवळीतील अधिवेशनात निर्भीडपणे याच स्वकृत चालीतील वंदे मातरम् चे गायन भव्य जन समुदायासमोर केले होते. स्वातंत्र्यसंग्रामात अतुलनीय पराक्रम गाजवलेले आणि प्रत्येक भारतीयाच्या मनात देशाभिमानाचे बीज रुजवणारे लोकमान्य टिळक हे कृष्णरावांचे स्वातंत्र्याकरता निर्भिडपणे दिलेल्या सांगीतिक लढ्यातील प्रेरणादायी श्रद्धास्थान होते. लोकमान्य टिळकांसमोर गणपती उत्सवामध्ये केसरी वाड्यात बखलेबुवांच्या उपस्थितीत गायन सादर करता आले, या गोष्टीचा त्यांना अभिमान वाटायचा. लोकमान्यांचे निकटवर्तीय साहित्यसम्राट केळकर, नाट्याचार्य खाडीलकर अशा सर्व थोर व्यक्तींचा मा. कृष्णरावांच्या संगीतकलेवर आणि व्यक्तिगत गुणांवर आत्यंतिक लोभ होता. त्यांनी आपल्या या महान श्रद्धास्थानाच्या निर्वाणानंतर वंदे मातरम् च्या माध्यमातून देत असलेला आपला स्वातंत्र्य लढा अधिक कणखर केला.

(उर्वरित मजकूर पान ८ वर...)

# 'संगीतकलानिधींचे सव्वाशे वयमान!'

(...पान ४ वरून)

भारताला १९४७ साली स्वातंत्र्य मिळाल्यानंतर भारताचे राष्ट्रगीत कोणते असावे? हा प्रश्न तत्कालिन राज्यकर्त्यांना पडला. 'वंदे मातरम्' ही मातृभूमीची वंदना आहे म्हणून, तेच गीत राष्ट्रगीतासाठी योग्य आहे, असे मास्तरांचे ठाम मत होते. या प्रार्थनेच्या भावनेतून मास्तरांनी त्या गीतास चाल लावली होती. मास्तरांनी तत्कालिन पंतप्रधान पं.नेहरू यांची भेट घेतली. राष्ट्रगीताची चाल ही लहानांना व मोठ्यांना आणि स्त्री-पुरुषांना एकत्रितपणे सामूहिकरीत्या गाता यावी, म्हणून मास्तरांनी वंदे मातरम् ला प्रामुख्याने मंद्र आणि मध्य सप्तकात गायला जाणाऱ्या झिंझोटी रागातील सोपी व सुमधुर चाल लावली होती. पुढे स्वातंत्र्यानंतर १९४७ ते १९५० या काळात मास्तरांनी संसदेत घटना समितीच्या सदस्यांसमोर 'वंदे मातरम्'ची अनेक प्रात्यक्षिके दिली. या गीताला १९५० मध्ये सरकारतर्फे राष्ट्रीय गीत म्हणून राष्ट्रगीताइतकाच बहुमान मिळाला या निर्णयात मास्तरांचे योगदान महत्त्वाचे मानले जाते.

अनेक वर्षे स्वखर्चाने मास्तरांनी वंदे मातरम् हे राष्ट्रगीत व्हावे हा ध्यास घेऊन त्याकरिता अविरत मेहनत घेतली होती. ब्रिटिश राजवटीत आकाशवाणीवर हे गीत त्यांना म्हणू न दिल्याने त्यांनी आकाशवाणीवर गाण्यास बहिष्कार टाकला होता. १९४७ साली स्वातंत्र्य दृष्टीक्षेपात आल्यावर भारत सरकारने वंदे मातरम् या गीतावरील बंदी उठवली, तेव्हा सरदार वल्लभभाई पटेल यांच्या खास विनंतीवरून मास्तरांनी हिंदु नववर्ष दिनी म्हणजेच गुढी पाडव्याला आकाशवाणीवर वंदे मातरम् हेच गीत गाऊन आपला आकाशवाणीवरील बहिष्कार मागे घेत तेथील सांगीतिक कारकिर्दीचा पुनः प्रारंभ केला.

संसदेत घटना समितीच्या सदस्यांसमोर वंदे मातरम् हे देशाचे राष्ट्रगीत होण्यासाठी मास्तरांनी केलेले अथक प्रयत्न व त्यांची सांगीतिक विद्वत्ता पाहून १९५६ साली डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मास्तरांची प्रत्यक्ष भेट घेतली व त्यांना बुद्धवंदना सांगीतिक मीटरमध्ये बसविण्याची विनंती केली. मास्तरांनी त्या विनंतीचा विनम्रपणे स्वीकार केला व भगवान बुद्धदेवाची सेवा या भावनेने कोणतेही मानधन न घेता त्यांनी बुद्धवंदना संगीतबद्ध केली.

मास्तरांना मास्टर कृष्णा, गायकांचा नेता, राजगंधर्व इत्यादी उपाध्या, बालगंधर्व सुवर्णपदक, विष्णुदास भावे सुवर्णपदक, पद्मभूषण, साहित्य अकादमी रत्न सदस्यत्व, इत्यादी पुरस्कार असे अनेक मानसन्मान तर लाभलेच; पण सद्गुरू कृपा, गुरूंचा भरभरून आशीर्वाद, भारतमातेचा आशीर्वाद, जन्मदात्री मातेचा आशीर्वाद आणि मुख्यत्वे मायबाप रसिकांचे अपरंपार प्रेम त्यांना सदैव लाभले.

**(लेखिका या संगीत अभ्यासक असून मास्टर कृष्णराव यांच्या नात आहेत.)**